# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ९० वी बैठक दिनांक २७ मे २०१५

## कार्यवृत्तांत व ठराव

मा. ना. गिरीष महाजन, मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ९० वी बैठक मंगळवार दि. २७ मे २०१५ रोजी मा. मंत्री, जलसंपदा यांचे मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. गिरीष महाजन | ... | मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |
| २. | मा. ना.श्री. विजय शिवतारे | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| ३. | श्रीमती मालिनी शंकर | ... | प्रधान सचिव (जप्र व वि) व सदस्य |
| ४. | मा. इंजि. हि. ता.मेंढेगिरी | ... | सचिव (जव्यसं व लावि) व सदस्य |
| ४. | इंजि. रा. ब. घोटे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नं. वि. पाटील | ... | अवर सचिव (अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी) |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. अ.कि. सुरुशे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. अ.कि. सुरुशे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे (अ.का.) |
| ३. | श्री. म. ग. टेळे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (अ.का.) |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

**कार्यकारी संचालक,**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९० वी बैठक दिनांक २७ मे २०१५

## ठराव

मा. ना. गिरीष महाजन, मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ९० वी बैठक मंगळवार दि. २७ मे २०१५ रोजी मा. मंत्री, जलसंपदा यांचे मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. गिरीष महाजन | ... | मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |
| २. | मा. ना.श्री. विजय शिवतारे | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| ३. | श्रीमती मालिनी शंकर | ... | प्रधान सचिव (जप्र व वि) व सदस्य |
| ४. | मा. इंजि. हि. ता.मेंढेगिरी | ... | सचिव (जव्यसं व लावि) व सदस्य |
| ४. | इंजि. रा. ब. घोटे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नं. वि. पाटील | ... | अवर सचिव (अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी) |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. अ.कि. सुरुशे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. अ.कि. सुरुशे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे (अ.का.) |
| ३. | श्री. म. ग. टेळे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (अ.का.) |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९० वी बैठक दिनांक २७ मे २०१५

## ठराव

**ठराव क्र. ९०/१**

"ठराव करण्यात येतो की, दि. २६/८/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८९ व्या बैठकीत कोणतेही नवीन ठराव पारित झालेले नसल्याने ते पारित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही."

**ठराव क्र. ९०/२**

"ठराव करण्यात येतो की, सन २०१३-१४ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेखा महामंडळाचे सनदी लेखापाल यांनी तयार केला असून त्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९०/३**

"ठराव करण्यात येतो की, सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीचा महामंडळाचा भांडवली अर्थसंकल्प सनदी लेखापाल यांनी तयार केला असून सदरील अर्थसंकल्प राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्विलोकन समितीस सादर करण्याकरिता शासनाचे पत्र क. बीजीएम १०.१५/(१५/२०१५)/अर्थ-१ दि. १६/१/२०१५ अन्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीचा महामंडळाचा भांडवली अर्थसंकल्पास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

**ठराव क्र. ९०/४**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१३-१४ या वर्षासाठीच्या १८ व्या वार्षीक अहवालास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे, तसेच सदर अहवाल राज्य शासनास सादर करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९०/५**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या ताब्यातील वारणा प्रकल्पाच्या उजव्या कालव्या जवळील मौजे आंबोली ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील भूमापन ग.नं.४६ जी/३ मधील ०.११ हे. इतके क्षेत्र इंद्र हायड्रो पॉवर प्रोजेक्ट, कोल्हापूर या विकासकाला वारणा उजवा कालवा जलविद्युत प्रकल्पासाठी ३० वर्षाचे कालावधीसाठी शासन निर्णय दि.१५/०९/२००५ मधील तरतुदीनुसार भाडेपट्टयाने देण्यासाठी सदरील प्रस्ताव नियामक मंडळाच्या शिफारशीसह शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९० वी बैठक दिनांक २७ मे २०१५

ठराव क्र. ९०/६

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे ताब्यातील खडकवासला प्रकल्पा अंतर्गतची नवीन मुठा उजवा कालवा कि.मी.१९ लगतची सर्व्हे नं.४९३ मधील ०.०२ हेक्टर विना वापर संपादित जमीनीची चालू मुल्यांकनानुसार होणारी किंमत अर्जदार संस्थेकडून महामंडळास मिळण्याचे अटीवर मागणी जागा जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत ग्रामपंचायत मांजरी बुद्रुक फुरसुंगी व उरुळी देवाची यांना कायम स्वरुपी हस्तांतरीत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९०/७

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यातील धोम पाटबंधारे वसाहत वाई येथील वर्ग-१व वर्ग-२ वर्ग २/१ व ३ रिकामे गोडावुन एकूण क्षेत्रफळ ७२,२१० चौ.फुट, आहे त्या स्थितीमध्ये महामंडळाच्या / शासनाच्या प्रचलीत दराने २ वर्ष कालावधीसाठी भाडेपट्टा तत्वावर उप विभागीय अधिकारी (प्रांत) वाई यांना देणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

ठराव क्र. ९०/८

"ठराव करण्यात येतो की,

अ) निविदा स्विकृतीची कार्यवाही महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार सक्षमस्तरावर (कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता ) करण्यात यावी.तसेच या निविदानां संकेतांक देण्याची जबाबदारी महामंडळस्तरावर कार्यकारी संचालक यांची राहील.

ब) प्रकल्पांतर्गत कामे प्रगत असताना खंड-३८,अतिरिक्त बाब दरसूची,भाववाढ इत्यादी कारणामुळे होणऱ्या निविदेवरील वाढीस महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार सक्षमस्तरावर (कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता) मान्यता देण्यास नियामक मंडळाने सहमती दर्शविली.

याबाबत पुढील कार्यवाहीस्तव व सर्व महामंडळात सारखीच कार्यप्रणाली असण्यासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने शासनाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठवावा."

<u>आयत्या वेळचे विषय</u>

ठराव क्र. ९०/९

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कृष्णानगर, तालुका व जिल्हा सातारा वसाहतीमधील विनावापर मोकळी २० एकर व इमारती असलेली ५ एकर अशी एकूण २५ एकर जागा जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे शासकीय वैद्यकिय महाविद्यालयासाठी वर्ग करणे, सदर

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९० वी बैठक दिनांक २७ मे २०१५

**जागेचा दर ठरविणे, जागेवर अस्तित्वात असलेल्या इमारती आरोग्य विभागाने स्वखर्चाने बांधून देणे, याबाबी धोरणात्मक असल्याने या विषयीचा प्रस्ताव निर्णयार्थ शिफारसीसह शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

**(इंजि. रा. ब.घोटे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(मा. ना. श्री. गिरीष महाजन)**
**मा.मंत्री, जलसंपदा**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**